**महाराष्ट्र शासन**

**नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे कार्यालय**

## सूचना

या सूचनेव्दारे ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ च्या कलम ८-ब मधील तरतूदीनुसार मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हयांसाठी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्याकरीता खालील प्रवर्गातून प्रत्येक जिल्ह्यासाठी एकुण २८ अशासकीय जागांसाठी व्यक्ती/ संस्थाकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | अशासकीय सदस्यांची संख्या | महीला आरक्षण |
|---|---|---|---|
| १. क | महानगरपालिकेचे सदस्य | ८ | सदर अशासकीय सदस्यांपैकी किमान २०टक्के महिला सदस्यांचा समावेश असेल |
| २. ख | कृषि उत्पन्न बाजार समितीचे प्रतिनिधी | २ | |
| ३. ग | ग्राहक संघटनांनचे प्रतिनिधी | १० | |
| ४. घ | शाळा/महाविद्यालयाचे प्रतिनिधी | २ | |
| ५. च | वैद्यक व्यवसायाचे प्रतिनिधी | २ | |
| ६. छ | व्यापार व उद्योग क्षेत्राचे प्रतिनिधी | २ (प्रत्येकी एक) | |
| ७.ज | प्रट्रोल व गॅस विक्रेत्यांचे प्रतिनिधी | २ (प्रत्येकी एक) | |

वरील अशासकीय सदस्य पदांवरील नियुक्ती प्रक्रिया व त्याव्दारे करण्यात येणारी निवड शासन निर्णय क्रमांक- ग्राराप-१०१३/प्र.क्र.११९/ग्रा.सं.२, दिनांक-१९ ऑक्टोबर, २०१३ मधील तरतूदीनूसार करण्यात येईल. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच या संदर्भातील सविस्तर जाहिरात नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांच्या www.controllerofrationing.net यावरही उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

उक्त शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अर्जात संपूर्ण माहिती भरुन त्यासोबत शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट अ व ब मध्ये नमूद केलेल्या मूळ कागदपत्राच्या सांक्षाकित प्रती जोडून सदर जाहिरात प्रसिध्द

झाल्यापासून १५ दिवसाच्या आत नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे कार्यालय, रॉयल इन्शुरन्स इमारत, १४, ज.टा.मार्ग, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०. या पत्यावर विहित वेळेत प्राप्त होतील या बेताने सादर करावा. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

टिप-

अशासकीय सदस्य पदांसाठी दि. ३०, ऑक्टोबर, २०१३ व दिनांक : १८ डिसेंबर, २०१३ रोजी अनुक्रमे दैनिक नवाकाळ व दैनिक सकाळ्या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहीरातीच्या अनुषंगाने ज्या व्यक्ती/ संस्थांनी विहीत मुदतीत या कार्यालयास परीपूर्ण अर्ज सादर केले आहेत, त्यांचे अर्ज विचारात घेतले आहेत. त्यामुळे त्या व्यक्ती/संस्थांनी या कार्यालयाकडे पुन्हा अर्ज पाठविण्याची आवश्यकता नाही.

स्थळ : मुंबई
दिनांक- ० जून, २०१४.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा
मुंबई